# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.)

---

**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.२०२०/आ.व्य./CSC,आधार/कावी

दि.१८.०४.२०२०

**विषय:- करोना विषाणू (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

(आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत, म.ई.से. व इतर), आधार नोंदणी केंद्र)

**वाचा:-**
**१.आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार.**
**२.साथ रोग प्रतिबंध कायदा १९७८ नुसार.**
**३.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३**
**४.महाराष्ट्र कोवीड-१९ उपाययोजना नियम २०२०**
**५.महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.१७.०४.२०२०**

**<u>आदेश,</u>**

वरील विषयास अनुसरून आदेशित करण्यात येते कि, शासनाने करोना विषाणुचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाय योजना करण्या बाबत सुचित केले आहे. त्यानुषंगाने सदर विषाणूचा प्रादुर्भाव न होऊ देता महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.१७.०४.२०२० नुसार आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत, म.ई.से. व इतर), आधार नोंदणी केंद्र खालील नियम व अटी नुसार सुरु ठेवणे बाबत आदेशित करीत आहे.

**अटी व शर्थी:**

१. सर्व आपले सरकार सेवा केंद्र, आधार नोंदणी केंद्र चालकांनी आपल्या केंद्राचा परिसर व केंद्रातील सर्व उपकरणांची दररोज स्वच्छता करावी.
२. सर्व आधार नोंदणी केंद्रावरील व्यवस्थापक व कर्मचारी यांनी करोनाच्या स्वच्छता पद्धतीचे पालन करावे तसेच वेळोवेळी हाथ धुवावेत.
३. तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी काम करते वेळी डोळे, नाक व तोंडाला हाताने स्पर्श टाळावे व कर्मचारी व नागरिकांनी मास्क वापरणे बंधनकारक राहील.
४. आधार नोंदणी केंद्रांना भेट देणाऱ्या नागरिकांना Biometric उपकरणे व इतर साधनांना स्पर्श करण्यापूर्वी हाथ साबणाने स्वच्छ करणे बाबत सूचित करावे व केंद्रचालकाने याबाबत व्यवस्था करावी.
५. केंद्र चालक यांनी प्रत्येक नोंदणी नंतर Biometric उपकरणे व इतर साधनांना स्वच्छ करावे.
६. आधार केंद्रातील कर्मचाऱ्यांपैकी जर कोणी सर्दी, ताप, खोकला किंवा श्वसनाच्या त्रासाने ग्रस्त असेल तर त्यांना पूर्णपणे बरे होई पर्यंत आधार नोंदणी केंद्रात काम करू देऊ नये.
७. जर एखादा नागरिक सर्दी, ताप, खोकला किंवा श्वसनाच्या त्रासाने ग्रस्त असेल आणि आधार केंद्रात काही कामानिमित्त आला असेल तर त्यांना पूर्णपणे बरे झाल्या नंतर येण्यासाठी विनंती करावी.

Scanned by CamScanner

८. नोंदणी केंद्रातील आपले सरकार सेवा केंद्र, आधार नोंदणी केंद्र व्यवस्थापकांनी केंद्रात व केंद्राबाहेर गर्दी होणार नाही याबाबत social distancing पाळणे अनिवार्य आहे. त्यानुसार नागरिकांमध्ये १ मीटर अंतर असणे व त्यानुसार आखणी करणे केंद्रचालक यांना बंधनकारक राहील.

९. केंद चालक/ नागरिक यांनी वरीलप्रमाणे आदेशाचे पालन न करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, केंद्राजवळ विनाकारण फिरणे इत्यादी गैरकृत्य केल्याचे आढळल्यास या कार्यालयाचे दि.१८.०४.२०२० चे आदेश नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१०. सर्व केंद्रांनी वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या सूचना आपले सरकार सेवा केंद्र, आधार नोंदणी केंद्राच्या दर्शनीय भागात लावाव्यात.

सदरील आदेशाची आवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल. तसेच आपती व्यवस्थापन कायदा २००५, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अंतर्गत संबंधितावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

प्रति: १) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
३) पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४) उपविभागीय अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना पुढील कार्यवाहीस्तव
५) तहसीलदार, हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा ना./सेनगाव यांना पुढील कार्यवाहीस्तव.
६) गट विकास अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा ना./सेनगाव यांना पुढील कार्यवाहीस्तव.
७) जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक, जि.अ.का.हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

Scanned by CamScanner